# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601,22690602.22641150.22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ

क्रमांक: 2अ/एडीएम/2014/ ९ ७८२
दिनांक: 20 SEP 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतनांमधील A-View Centers शिक्षक प्रशिक्षणाकरिता उपलब्ध करणेबाबत.....

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१४/ १२४३/ प्र क्र २३१/ तांशि-४, दिनांक १८.९.२०१४

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्याच्या शालेय शिक्षण विभाग व आय आय टी मुंबई यांच्यातील करारपत्रानुसार राज्यातील १५००० माध्यमिक शाळांतील शिक्षकांना गणित विषयाचे प्रशिक्षण राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत दयावयाचे आहे. A-View सुविधा उपलब्ध असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये , तंत्रनिकेतनांमधून हे प्रशिक्षण देण्याचे योजले आहे.

सदर प्रशिक्षण दिनांक ७ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर २०१४ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी आपल्या अधिनस्त अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांना A View Centeres उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच त्या संस्थांची नावे,पत्ता,संपर्कासाठी संस्थाप्रमुखाचे नाव ही माहिती राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान ,मुंबई ,जवाहर बाल भवन,नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ यांना rmsamaharashtra@gmial.com आणि skharats७२@gmial.com या ईमेलवर पाठविण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास पाठविण्यात यावा.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :
१) मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर
२) राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान ,मुंबई ,जवाहर बाल भवन,नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ यांना माहितीकरिता

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/शैवि—३/एव्हयुसेंटर/२०१४/ ३११३
दिनांक : 29 SEP 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित अभियांत्रिकी, पदवी व तंत्रनिकेतने पदविका संस्था नागपूर विभाग, नागपूर.

यांना कळविण्यांत येते की, पत्रामध्ये नमूद केलेली **A-View** प्रशिक्षणाबाबतची माहिती या कार्यालयात त्वरीत उपलब्ध देण्यांत यावी.

(गुलबिराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

महाराष्ट्र शासन

संकीर्ण-२०१४/१२४३/प्र.क्र. २३१/तांशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१४

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच तंत्रनिकेतनामधील A-VIEW Centers शिक्षक प्रशिक्षणाकरीता उपलब्ध होणेबाबत

वरील विषयाबाबत राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे दिनांक १५.०९.२०१४ चे पत्र सोबत जोडले आहे.

२. शालेय शिक्षण विभाग व IIT मुंबई यांच्यातील करारपत्रानुसार राज्यातील १५००० माध्यमिक शाळांतील शिक्षकांना गणित या विषयाचे प्रशिक्षण राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत सन २०१४-१५ मध्ये देणे नियोजित आहे. राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने जेथे A-VIEW सुविधा उपलब्ध आहे, तेथे जवळपासच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांना गणित विषयांचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे.

३. सदर प्रशिक्षण दिनांक ०७ व ०८ ऑक्टोबर, २०१४ रोजी नियोजित असून सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळाकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयातील A-VIEW Centres सदर प्रशिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावीत, अशी विनंती राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे. तसेच या सर्व A-View Centres चे पत्ते आणि Centre Coordinator ची नावे व पत्ते उपलब्ध करुन देण्याबाबतही त्यांनी कळविले आहे.

४. राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांच्या विनंतीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये वरील प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसेच सर्व A-View Centres चे पत्ते आणि Centre Coordinator ची नावे व पत्ते राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांना उपलब्ध करुन द्यावीत.

(स. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, जवाहर बाल भवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई – ४०० ००४. → Email- rmsamaharashtra@gmail.com

skharat572@gmail.com

D:\फाईल\संचालक पत्र.docx

JT. DTE